**मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**सायबर गुन्हे कक्ष**
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :-६१९/२०२२ दिनांक :- १६/०७/२०२२.

## तक्रारदार यांची फसवणुक झालेली ५७,०२८/- रक्कम त्यांचे खात्यात तात्काळ जमा करण्यात सायबर गुन्हे कक्षास यश !!!

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत मिरारोड परीसरात राहणारे श्रीमती. शहनाझ जुनैद मकडी रा.मिरारोड पुर्व. यांना त्यांचे मोबाईल फोनवर अनोळखी लिंक प्राप्त झाली होती. सदर लिंकवर तक्रारदार यांनी क्लिक केल्यावर काही वेळाने त्यांचे एचडीएफसी बँक खात्यातुन ५७,०२८/- रु कपात झाल्याबाबत मॅसेज त्यांना प्राप्त झाला. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे बँक खात्यातील शिल्लक तपासुन पाहिली असता त्यांचे खात्यातुन वरील रक्कम E-commerce कंपनीच्या माध्यामातुन पुढे वळती झाल्याचे त्यांना दिसुन आले. सदरबाबत तक्रारी अर्ज **सायबर गुन्हे कक्ष येथे आवक क्रमांक १०६५/२०२२ दिनांक १५/०७/०२२ रोजी** चौकशीकामी प्राप्त करण्यात आला होता.

नमुद तक्रारीबाबत सायबर गुन्हे कक्षाने तात्काळ दखल घेवुन तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत अवलोकन करुन तक्रारदार रक्कम वळती झालेल्या कंपनीसोबत तात्काळ पत्रव्यवहार केला. उपरोक्त पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने तक्रारदार यांची **फसवणुक झालेली ५७,०२८/- रक्कम त्यांचे खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

### अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी

- आपल्या बँकेचे स्टेटमेंट, खात्याची शिल्लक वेळोवेळी तपासावेत.
- तसेच बँकेकडुन येणारे मॅसेज यांची माहिती ठेवावी.
- आपल्या बँक खात्याचे संबंधीत माहिती कोणासही देवु नये.
- आपला मोबाईल कोणालाही हाताळण्यास देवु नये.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अश्या या प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणुक झाल्यास अथवा असे कृत्य कोणी इसम करीत असल्यास आढळुन आल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईन संपर्क साधुन तक्रारी द्यावी.

सदरची कामगिरी मा.श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री.अमोल मांडवे,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री.सुजितकुमार गुंजकर, पोनि/सायबर क्राईम सेल, श्री.प्रसाद शेनोळकर, पोउनि/सायबर क्राईम सेल, पोशि/ गणेश इलग, पोशि/ प्रविण आव्हाड, मपोशि/सुवर्णा माळी, मपोशि/ माधुरी धिंडे, यांनी केली असुन यांनी पार पाडली आहे.

सायबर गुन्हे कक्ष संपर्क क्रमांक :- ०२२-२८११-०१३५
सायबर गुन्हे कक्ष व्हॉटसॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५

- सायबर गुन्हे कक्ष ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**